Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18849844

# लोकशाही शासन आव्हाने आणि उपाय

**आबासाहेब आर.कसबे**[1]

**प्रस्तावना**

लोकशाही ही आधुनिक राजकीय व्यवस्थेची सर्वात व्यापक आणि स्वीकारलेली संकल्पना मानली जाते. प्राचीन ग्रीसमधील अथेन्स येथे लोकशाहीचा उगम झाला असला, तरी आधुनिक काळात तिचे स्वरूप अधिक व्यापक, समावेशक आणि संस्थात्मक झाले आहे. लोकशाही केवळ शासनपद्धती नसून ती एक जीवनपद्धती, मूल्यप्रणाली आणि सामाजिक-राजकीय संस्कृती बनलेली आहे. व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय,अधिकार आणि लोकसहभाग ही लोकशाहीची मूलभूत आणि आवश्यक तत्त्वे मानली जातात. आज जगातील बहुसंख्य राष्ट्रे लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार करतात.अमेरिका ,रशिया ,चीन,उत्तर कोरिया,इराण सारखे भांडवलशाही, साम्राज्यवादी राष्ट्रे देखील आम्ही लोकशाहीचे पुरस्कर्ते आहोत हे सांगतांना दिसतात. लोकशाही ही जगातील सर्वसामान्यपणे पाळली जाणारी सरकारची पद्धत आहे .उदा. 2018 मध्ये किमान 500,000 लोकसंख्या असलेल्या 167 देशापैकी एकूण 96 देश (जवळपास 57%) कोणत्या ना कोणत्या प्रकारची हुकुमशाही असली तरी ते स्वतः लोकशाहीवादी देश म्हणवितात. ही लोकशाहीची यशस्वीता असली तरीही लोकशाहीसमोर अनेक गंभीर आव्हाने उभी आहेत. वाढती असमानता, भ्रष्टाचार, राजकीय उदासीनता, माध्यमांचा गैरवापर, लोकानुनयी राजकारण आणि तंत्रज्ञानाचा दुरुपयोग यांसारख्या समस्या लोकशाहीच्या मुळावर घाव घालताना दिसतात. प्रस्तुत संशोधनात लोकशाहीची शासनपद्धती आणि तिच्यासमोरील प्रमुख आव्हाने आणि त्यावरील उपाय यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे.

**मुख्य संकल्पना - लोकशाही,प्रकार,आव्हान,उपाय**

लोकशाही ही एक जीवनपद्धती बनली आहे. राज्यघटनेचा व राज्यव्यवस्थेचा हा प्रकार असून लोकशाहीमध्ये सत्ता ही जनतेच्या हातात असते.1863 च्या प्रसिद्ध गेटिसबर्ग येथील भाषणात अब्राहम लिंकन यांनी " लोकांनी लोकांसाठी लोकांनसाठी लोकांकडून चालवलेले शासन म्हणजे लोकशाही शासन" अशी लोकशाहीची व्याख्या केली होती. Democracy हा शब्द लॅटिन भाषेतील Demos म्हणजे लोक आणि kratos म्हणजे सत्ता (Demokratia )या शब्दापासून बनला असून त्याचा अर्थ लोकांची सत्ता rule by the people असा होतो. लोकशाहीचा उदय प्राचीन ग्रीक देशांत झाला असल्याचे दिसून येते.ग्रीक देशातील

[1] संशोधक विद्यार्थी-वैजापूर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छ.संभाजीनगर

अथेन्स येथे ख्रिस्तपूर्व 508-507 या वर्षात जगातील पहिले लोकशाही राज्य अस्तित्वात आल्याचे आढळून येते. त्या 'अथेनियन' डेमोक्रसी असे म्हणतात.याचा अर्थ अडीच हजार वर्षापूर्वी लोकशाही शासन व्यवस्था अस्तित्वात आल्याचे दिसून येते.

**लोकशाहीची व्याख्या**

'लोकशाही' म्हणजे "लोकांची सत्ता" असा त्याचा अर्थ होतो "लोकांचे सरकार, लोकांसाठी सरकार आणि लोकांद्वारे चालवलेले सरकार म्हणजे लोकशाही." अशी व्याख्या अब्राहम लिंकन केली आहे. त्याचबरोबर अनेक विचारवंतांनी लोकशाहीची वेगवेगळया प्रकारे केली

1.डायसी:- लोकशाही म्हणजे बहुसंख्य लोकांच्या इच्छेनुसार चालणारे शासन.

2.सीली :- ज्या शासनपद्धतीत नागरिकांचा शासनकार्यात सक्रिय सहभाग असतो, ती लोकशाही होय.

3.लॉर्ड ब्राईस :-" ज्या शासन व्यवस्थेत पात्र अशा नागरिकांच्या बहुसंख्याकांची ईहा (will) सार्वभौम असते आणि पात्र नागरिकांची संख्या किमानपक्षी तीन चतुथांश असते,ज्यामुळे नागरिकांचे बलसामर्थ्य (सामान्यतः विचार करता) त्यांच्या मतसामर्थ्यावर जुळते ,तिला लोकशाही म्हणता येईल."1

3.प्रो.मेरीअम :- "लोकशाही म्हणजे काही ठराविक सूत्र नाही वा संघटनेचा आराखडा नव्हे,तर समान इच्छेनुसार निर्माण करावयाच्या कल्याणकारी समाजाकडे वळलेल्या विचारांचा प्रवाह व कृतीचा मार्ग होय." 2

या व्याख्यांवरून असे स्पष्ट होते की लोकशाहीत अंतिम सत्ता लोकांकडे असते आणि शासन लोकांच्या इच्छेप्रमाणे चालवले जाते.

**लोकशाहीचा अर्थ**

लोकशाहीचा अर्थ केवळ निवडणुका घेणे किंवा सरकार बदलणे एवढाच मर्यादित नाही. लोकशाही ही एक व्यापक संकल्पना आहे. या प्रक्रियेत सर्व जनतेचा सहभाग होतो किंबहुना जनतेच्या सहभागाशिवाय लोकशाही असेल तर त्याला लोकशाही म्हणता येणार नाही. लोकशाहीचा अर्थ पुढील घटकांतून अधिक स्पष्ट करता येईल.

1.**लोकांची सत्ता -** लोकशाही हा शासन प्रकार लोकांच्यत्तेवर आधारित असल्याचे दिसून येतो , या व्यवस्थेत अंतिम सत्ता ही जनतेकडे असते म्हणजेच जनता सार्वभौम असते. कोणताही निर्णय हा जनतेच्या

सहमतीशिवाय पूर्णत्वास येऊ शकत नाही.एखाद्या प्रश्नांच्या बाबतीत जनतेला (जनतेच्या सभागृहाने) अमान्य असेल तर तो निर्णय पूर्ण होऊ शकत नाही.थोडक्यात या शासन प्रकारात लोकांची सत्ता ही अंतिम असल्याचे दिसून येते..

**2.सहभागी शासन** - लोकशाही शासनात सर्व नागरिकांचा सहभाग दिसून येतो, मुळातच हा शासन प्रकार जनतेच्या सहभागावर आधारित आहे .जनतेला निर्णयप्रक्रियेत सहभागी होण्याचा पूर्ण अधिकार यात असतो. जनतेच्या सहमतीशिवाय कोणताही निर्णय होऊ शकत नाही.

**3.हक्क व स्वातंत्र्य** - व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी हक्क आणि स्वातंत्र्य अत्यंत महत्वाचे असतात, एखाद्या शासनाची उपोयोगीता ही त्या शासनाने व्यक्तीला दिलेल्या हक्क आणि स्वातंत्र्याच्या अधिकारावरून दिसून येते,लोकशाही शासन हे व्यक्तीच्या स्वातंत्र्य आणि हक्कांसाठी कटिबद्ध असणारा शासन प्रकार आहे, "अमेरिकेच्या संविधानातील " BILL of RIGHT आणि फ्रांस राज्यक्रांतीचे " DECLARATION OF THE RIGHTS OF MAN" यात अधिकारांविषयी विवेचन दिसून येते." 3. हक्कांबरोबरच स्वातंत्र्य महत्वाचे असतात ,हक्क आणि स्वातंत्र्य बरोबरच लोकशाही शासनात व्यक्तीच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य यांना महत्वाचे स्थान असल्याचे दिसून येते.

**4.कायद्याचे राज्य** - पूर्वीच्या काळी कायद्याचे स्वरूप हे बळी तो कानपिळी याप्रमाणे म्हणजेच श्रीमंताच्या हातात कायदा होता त्यामुळे साहजिकच त्याचा दुरुपयोग मोठ्याप्रमाणात होत असल्याचे दिसून येत होते, लोकशाही शासनात कायद्याचे अधिराज्य दिसून येते. कायदा हा सर्वांना समान असून सर्वसामान्य नागरिक ते देशाचा राष्ट्रपती सर्वच कायद्यापुढे समान असतात.

**5. नैतिक व मूल्याधिष्ठित व्यवस्था** - लोकशाही शासन हा नैतिकतेवर आधारित आहे यात सहिष्णुता, सहमती आणि संवाद यांवर अधिक भर दिला जातो. व्यक्तीला नैतिक आणि मूल्याधिष्ठित जीवनाचा धडा यातून दिला जाऊन आदर्श नागरिक घडविण्याचा प्रयत्न केला जातो म्हणूनच लोकशाही ही केवळ राजकीय रचना नसून ती सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनालाही प्रभावित करणारी व्यवस्था आहे.

**लोकशाहीची वैशिष्टये**

लोकशाही ही एक जीवनपद्धती बनल्याचे दिसून येते याची काही ठळक आणि मूलभूत वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत

1. **सार्वभौम जनता :-**

लोकशाहीत सार्वभौम सत्ता जनतेकडे असते. जनतेचे सार्वभौत्व दिसून येते, निर्णय प्रक्रियेत जनता ही प्रामुख्याने असते .जनता थेट किंवा अप्रत्यक्षरीत्या आपल्या प्रतिनिधींमार्फत सत्ता वापरताना दिसून येते. जनतेला अंतिम सत्ता असणारा हा अभिनव शासनप्रकार असल्याचे दिसून येते.

**2.निष्पक्ष निवडणूक व्यवस्था:-**

सत्तेत बदल किंवा परिवर्तन इतर व्यवस्थेत युद्धाच्या माध्यमातून होताना दिसून येतो त्यामुळे साहजिकच रक्तपात होण्याची शक्यता यात दिसून येते परंतु लोकशाही मध्ये सत्तेत बदल हा निवडणुकीच्या माध्यमातून होताना दिसतो, नियमित, मुक्त व निष्पक्ष निवडणुका हे लोकशाहीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. निवडणुकांद्वारे नागरिकांना आपले प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार हा लोकशाहीत असल्याने लोकशाही हा लोकप्रिय शासन प्रकार असल्याचे आढळून येतो.

**3 बहुपक्षीय व्यवस्था:-**

एकपक्षीय ,द्विवपक्षीय आणि बहुपक्षीय हे पक्ष पद्धतीचे महत्वाचे वैशिष्टये असल्याचे दिसून येते. पक्षपद्धतीवरून त्या देशाच्या व्यवस्थेचे स्वरूप समजते. एकपक्षीय आणि द्विवपक्षीय पक्षपद्धतीचे स्वरूप हे साधारणतः देशाच्या नागरिकांना पर्याय नसल्याने त्याचे स्वरूप काहीसे हुकुमशाही प्रमाणे दिसून येऊ शकते ,परंतु लोकशाहीमध्ये बहुपक्षीय स्वरूप असल्याने अनेक पर्याय जनतेसमोर असल्याने योग्य आणि उपयुक्त पक्षाला जनतेकडून संधी दिली जाते. यामुळे मतभिन्नता, स्पर्धा आणि पर्याय उपलब्ध होताना दिसून येते.

**4 मूलभूत हक्क आणि स्वातंत्र्य:-**

व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी मूलभूत हक्क हे महत्वाचे असतात.हक्कांच्या अभावी व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करता येणार नाही .मुलभूत हक्क हे निसर्ग अवस्थे पासून व्यक्तीला मिळाले असल्याने ते कोणीही हिरावून घेऊ शकणार नाही. हुकुमशाही व्यवस्थेत हे हक्क राज्यकर्त्यांच्या मनावर असल्याने हुकुमशाहा हे हक्क नागरिकाना देत नाही पर्यायाने त्या व्यवस्थेत व्यक्तींच्या विकासाला चालना मिळत नाही परंतु लोकशाही व्यवस्थेत नागरिकांना हे मूलभूत हक्क दिले जातात. हे हक्क लोकशाहीच्या संरक्षणासाठी अत्यंत आवश्यक असतात. हक्काबरोबरच कर्तव्य देखील महत्वाचे असून हक्क आणि कर्तव्ये ही एकाच नाण्याच्या बाजू असल्याचे दिसून येते.ज्यावेळेस आपण आपल्या हकाचा विचार

करतो त्याचवेळेस दुसऱ्यांच्या हक्कांचा विचार विचार करून आपले वर्तन करणे यातच आपले कर्तव्ये समाविष्ट असल्याने आपणा आपल्या कर्तव्याचे पालन करणे आवश्यक असल्याचे दिसून येते लोकशाही शासन हक्क आणि कर्तव्ये यावर जोर देताना दिसून येते.

**5. कायद्याचे राज्य:-**

व्यक्तीच्या वर्तनाला समाजाच्या वर्तनाशी सुसंगत ठेवण्याचे काम कायदा करतो. कायद्याचे राज्य समाज व्यवस्थेशी अनुरूप वर्तन होय. कायद्याच्या राज्यात कोणताही व्यक्ती कायद्यापेक्षा मोठा नसतो. शासक आणि सामान्य नागरिक दोघेही समान कायद्याच्या अधीन असतात. लोकशाही शासन कायद्याच्या राज्याचा पुरस्कार करतो त्यामुळे सर्वांना समान वागणूक आणि आणि समान न्याय दिला जातो.

**6. स्वतंत्र न्यायव्यवस्था:-**

न्यायाच्या बाबतीत जनतेत भेदभाव होत असेल तर ती व्यवस्था कोलमडून पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. लोकशाहीत न्यायालये ही स्वतंत्र व निष्पक्ष असतात. त्यांच्यावर कोणाचेही दडपण असल्याचे दिसत नाही. लोकशाहीत न्यायालये ही सर्वांना समान न्याय देण्यास बांधील असतात ती नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करतात. निपक्ष व स्वतंत्र न्यायव्यवस्था असल्याने जनतेवर अन्याय होताना दिसत नाही.

**7. लोकमताचा आदर:-**

लोकशाही शासन प्रकारात जनता सार्वभौम असल्याने अंतिम निर्णय हा लोकांचा ,जनतेचा असतो त्यामुळे लोकशाहीत लोकमताला महत्त्व दिले जाते. चर्चा, संवाद आणि सहमती यांद्वारे कोणताही निर्णय घेतले जातात.

**8. लिखित संविधान :-**

संविधान म्हणजे लिखित नियमांचा समुच्चय होय .ज्याद्वारे राज्यव्यवस्था चालविली जाते.या नियमांच्या आधारे देशाचा राज्यकारभार चालविला जात असल्याने संविधानाला देशाचा सर्वोच्च कायदा म्हटले जाते.ज्याचे पालन करणे सर्वांना बंधनकारक असते.जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वाच्या सर्व घटकांचा संविधानात समावेश असल्याने त्यात सहसा बदल करता येत किंबहुना बदल करण्याची प्रक्रिया ही अत्यंत किचकट असते .लोकशाही शासन व्यवस्थेत संविधान हे लिखित असते अपवाद ब्रिटीशांचे संविधान

Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18849844

हे अलिखित असले तरी तेथील देशाचा राज्यकारभार रूढी,प्रथा ,परंपरा यावर चालतो यातील बहुतेक रूढी,प्रथा ,परंपरा या लिखित स्वरुपात दिसून येतात.

**9.धार्मिक स्वातंत्र्य :-**

लोकशाही शासन व्यवस्थेत सर्वधर्मसमभाव दिसून येत असल्याने धर्माच्या कारणावरून व्यक्तीत भेदभाव केला जात नाही. नागरिकांना कोणत्याही धर्माचा प्रचार ,प्रसार,स्वीकार करण्याचा अधिकार लोकशाहीत असतो. धार्मिक बाबतीत राज्य हस्तक्षेप करत नाही.

लोकशाहीच्या या विविध वैशिष्टयावरून लोकशाही शासन व्यवस्थेची परिपूर्ण माहिती समजण्यास मदत होते.

**लोकशाहीचे प्रकार**

जनतेला सार्वभौमत्व देणारा हा शासन आहे. हा शासन प्रकार लोकप्रिय म्हणून ओळखला जात असल्याने लोकशाहीचे समर्थन केले जाते.साधारणतः लोकशाहीचे मुख्यतः दोन प्रकार आढळतात :

**अ) प्रत्यक्ष लोकशाही;-**

लोकशाहीच्या या शासन प्रकारात जनतेचा प्रत्यक्ष सहभाग असतो. जनतेला या प्रकारात थेट निर्णय,धोरणप्रक्रियेत सहभागी होता येते. प्राचीन ग्रीसमधील अथेन्स हे याचे उत्तम उदाहरण आहे. आधुनिक काळात स्वित्झर्लंड येथे प्रत्यक्ष लोकशाहीचा प्रकार दिसून येत असल्याने जनतेला सार्वमत, जनोपक्रम,जनमत,प्रतिनिधी परत बोलावणे या चार अधिकारातून जनतेचे वर्चस्व दिसून येते यातील सार्वमत म्हणजे सरकारला एखादा कायदा किंवा घटनादुरुस्ती संमत करण्यापूर्वी जनतेचे थेट मत मागितले जाते,तसेच सार्वमत म्हणजे नागरिक स्वतःच एखाद्या नवीन कायद्याचा मसुदा किंवा घटनादुरुस्तीचा मसुदा तयार करून तो त्यांच्या संसदेसमोर मंजुरीसाठी ठेवतांना दिसतात तर जनमत म्हणजे सरकार एखाद्या महत्वाच्या प्रश्नांवर किंवा प्रादेशिक निर्णयावर जनतेचे मत मागवितात त्याचबरोबर निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींनी आपली जनतेप्रती विकासाची जबाबदारी पूर्ण करण्यात असमर्थ ठरले असल्याचे आदळून आल्यास त्या लोकप्रतिनिधींना पुन्हा पदावरून दूर करण्याचा अधिकार मतदारांना असतो .थोडक्यात प्रत्यक्ष लोकशाहीच्या या प्रकारात जनतेला महत्वाचे अधिकार असल्याने जनता खऱ्या अर्थाने सार्वभौम असल्याचे दिसून येते.

**ब) अप्रत्यक्ष (प्रतिनिधी) लोकशाही**

लोकशाहीच्या या शासन प्रकारात जनतेकडून निवडणुकीच्या माध्यमातून निवडून दिलेले प्रतिनिधीच्या मार्फत शासन चालविले जाते . आधुनिक राष्ट्रांमध्ये प्रामुख्याने हा प्रकार आढळतो. भारत, अमेरिका, इंग्लंड ही याची उदाहरणे आहेत.

**लोकशाहीसमोरील आव्हाने:-**

आजच्या काळात लोकशाही हा शासन प्रकार जगातील अधिकांश ठिकाणी अंगिकारलेला शासन प्रकार असून आधुनिक काळात ती एक जीवनपद्धती बनलेली असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्य,समानता ,बंधुता,न्याय ,कायदा ,हक्क याची हमी ही लोकशाही शासनातच मिळत असल्याने लोकशाहीचा स्वीकार करणाऱ्याची संख्या ही दिवसेंदिवस वाढतच आहे ,जगातील भांडवलशाही,साम्राज्यवादी राष्ट्रात देखील लोकशाही विचारसरणी रूढ होताना दिसून येत आहेत. लोकशाहीची लोकप्रियता ही सातत्याने वाढतच असतानाच लोकशाहीसमोर अनेक गंभीर आव्हानेही उभी असल्याचे दिसून येते

1. **भ्रष्टाचार:-**

भ्रष्टाचार एक गंभीर समस्या म्हणून पुढे आल्याचे दिसून येते.भ्रष्टाचारामुळे लोकांचा शासनावरचा विश्वास कमी होतो. भारतीय राजकारणात भ्रष्टाचाराने कळस गाठला आहे. राजकारणी लोकांच्या भ्रष्टाचाराच्या रंजक कथा सातत्याने वर्तमान पत्रात प्रसिद्ध होताना दिसतात. “सीपीआय ( ट्रान्सपेरेंन्सी इंटरनॅशनल ) च्या 2025 च्या अहवालानुसार भारताचा जगातील 180 देशामध्ये 96 क्रमाक हा भ्रष्टाचार करणारा देश असल्याचा अहवाल प्रसिद्ध आहे” 4. लोकशाही शासनात निवडणुकीत मोठ्या प्रमाणात पैशाचा वापर होताना दिसून येत आहे. “ मतदानाच्या पूर्वसंध्येला अकोल्यात तब्बल 50 लाख रुपयांची रोख रक्कम आढळून आली” 5 तसेच “ पुणे शहराच्या उपनगरामधील लढतीवर चुरशीच्या होण्याचे चित्र दिसत असून प्रत्येक विभागात किमान 100 कोटी रुपयांची उलाढाल होईल हे जाणकारांचे मत आहे” 6 इतक्या मोठ्या प्रमाणात पैशाचा होणारा वापर हा चिंताजनक असून निवडून आलेले प्रतिनिधी साहजिकच जनतेच्या प्रश्नाशी उत्तरदायी राहतीलच याची शाश्वती नसते. आमदार ,खासदार ,मंत्री,सरकार पाडणे या सारख्या घटनाच्या पाठीमागे मोठ्याप्रमाणात अर्थकारण असून त्याची परतफेड ही भ्रष्टाचार करून होताना दिसून येते. भ्रष्टाचारामुळे लोकशाहीची नैतिक पायाभरणी कमकुवत होताना दिसते.

**2. सामाजिक व आर्थिक असमानता:-**

सामाजिक समतेचा पुरस्कार करण्याची हमी भारतीय सांविधानाने दिली असली तरी त्याची अमलबजावणी होताना दिसून येत नाही. **सामाजिक व आर्थिक असमानता** ही एकतेच्या भावनेला तडा देण्याचे काम करते त्याचबरोबर वाढती गरिबी, बेरोजगारी आणि आर्थिक विषमता लोकशाहीच्या समतेच्या तत्त्वाला आव्हान देतात.

3.**राजकीय गुन्हेगारीकरण**:-

लोकशाही शासन प्रकारात सत्ता ही जनतेकडून चालविली जात असली तरी निवडणूक राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाल्याचे दिसून येते.राजकारणात नैतिकता असावी असा अलिखित नियम असला तरी या नियमाची अंमलबजावणी होताना दिसून येते नाही अनेक आमदार,खासदार ,मंत्री हे गुन्हेगारी प्रवृत्तीचे असल्याचे दिसून येते "2014 च्या लोकसभा निवडणुकीत गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले उमेदवारांचे विश्लेषण केलेल्या 337 उमेदवारांपैकी, 68 उमेदवारांनी (20 %) आपल्याविरुद्ध गुन्हेगारी खटले दाखल असल्याची घोषणा केल्याची नोंद आहे , त्यातील गंभीर फौजदारी गुन्हे असलेले उमेदवार: 337 उमेदवारांपैकी 47 उमेदवारांनी (14 %) खून करण्याचा प्रयत्न, अपहरण इत्यादींसारखे गंभीर फौजदारी गुन्हे घोषित केले आहेत तसेच पक्षनिहाय गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले उमेदवार: काँग्रेसकडे 10 पैकी 6 (60%), बसपाकडे 19 पैकी 6 (32%), मनसेकडे 7 पैकी 5 (71%), शिवसेनेकडे 8 पैकी 5 (63%), राष्ट्रवादी काँग्रेसकडे 8 पैकी 5 (63%), समाजवादी पक्षाकडे 10 पैकी 5 (50%), भाजपकडे 11 पैकी 4 (36%) आणि आम आदमी पक्षाकडे 19 पैकी 1 (5%) उमेदवार असे होते, ज्यांच्यावर गुन्हेगारी खटले दाखल असल्याचे घोषित करण्यात आले होते. त्याचबरोबर पक्षानुसार गंभीर गुन्हेगारी खटले असलेले उमेदवार: मनसेच्या 7 पैकी 5 (71%), राष्ट्रवादी काँग्रेसच्या 8 पैकी 4 (50%), शिवसेनेच्या 8 पैकी 4 (50%), बसपाच्या 19 पैकी 4 (21%), समाजवादी पक्षाच्या 10 पैकी 4 (40%), काँग्रेसच्या 10 पैकी 3 (30%), भाजपच्या 11 पैकी 2 (18%), आणि आम आदमी पक्षाच्या 19 पैकी 1 (5%) उमेदवारांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रांमध्ये स्वतःविरुद्ध गंभीर गुन्हेगारी खटले असल्याची घोषणा केली आहे. अपहरणाशी संबंधित गुन्हे असलेले उमेदवार: मुंबई दक्षिणमधून बाळ दगडू नांदगावकर (मनसे) यांच्यावर व्यक्तीला गुप्तपणे आणि गैरकायदेशीरपणे डांबून ठेवण्याच्या उद्देशाने अपहरण किंवा पळवून नेण्याशी संबंधित 1 आरोप आहे (भारतीय दंड संहिता कलम-365). मुंबई उत्तर मध्यमधून अझीमुद्दीन खान (द लोक पार्टी ऑफ इंडिया) यांच्यावर अपहरणाशी संबंधित 1 आरोप आहे (भारतीय दंड संहिता कलम-363). रेड अलर्ट मतदारसंघ*: महाराष्ट्रातील 19 पैकी 13 मतदारसंघांमध्ये किमान 3 उमेदवार असे आहेत, ज्यांच्यावर घोषित फौजदारी गुन्हे दाखल

आहेत. रावेर मतदारसंघात फौजदारी गुन्हे दाखल असलेल्या उमेदवारांची संख्या सर्वाधिक आहे, म्हणजेच 10 उमेदवार गुन्हेगारी पार्श्वभूमीसह निवडणूक लढवली होती"7 त्याचबरोबर आणखी काही लोकसभा निवडणुकांचे विश्लेषण केले असता लोकप्रतिनिधीवर किती गुन्हे आहेत हे समजू शकेल "2009 मधील लोकसभा निवडणूक दरम्यान 7810 पैकी 608 (8%) उमेदवारांनी गुन्हयाची माहिती दिली तसेच 2019 मध्ये 7928 पैकी 1500 (19%) उमेदवारांनी गुन्हयाची माहिती नोदविली होती त्याचबरोबर 2024 च्या लोकसभा निवडणुकीत 543 मतदारसंघात 8337 उमेदवार उभे होते त्यातील 1643 (20%) उमेदवारांनी आपल्यावरील गुन्हयांची माहिती दिली होती त्यतील 1191 (14%) गंभीर गुन्हे असणारे उमेदवार होते यातील 197 उमेदवारांवर महिलाच्या संदर्भात गुन्हे दाखल होते विशेष म्हणजे यातील 16 उमेदवारांवर बलात्कारासारखे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे दिसून येते."8. लोकप्रतिनिधीच जर गुन्हेगारी पार्श्वभूमीचे असतील तर त्यांच्या कडून सुशासनाची अपेक्षा कशी करता येऊ शकते असा ही मतप्रवाह निर्माण झाल्याचे दिसून येते. लोकशाहीत राजकारणाचे वाढते गुन्हेगारीकरण एक जटील आव्हान म्हणून पुढे आल्याचे दिसून येते .

**3. राजकीय उदासीनता:-**

राजकारणा विषयी उदासीन ,राजकारणात प्रत्यक्ष भाग घेणारा आणि राजकारणावर चर्चा करणारा असे राजकीय मानवाचे तीन प्रकार राज्यशास्त्राचे जनक अँरिसटॉटल यांनी सांगितले आहे . निवडणूकीत मोठ्याप्रमाणात होत असलेल्या पैशाचा वापर,विकासाची दृष्टी नसलेले नेतृत्व व राजकारणातील परीवारवाद यामुळे लोकशाही शासनाच्या मोठ्या प्रमाणात होत असलेल्या दुरुपयोगामुळे या शासनाविषयी नकारात्मक भावना निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे.निवडणुकीत मतदानाची होत असलेली टक्केवारी हा राजकीय उदासीनतेचा परिणाम असून लोकशाहीपुढे एक आव्हान निर्माण झाले आहे .

**4. लोकानुनयी राजकारण:-**

लोकप्रिय घोषणा देऊन मतदाराला प्रलोभन देण्याचा राजकीय पायंडा लोकशाहीत निर्माण झाला आहे त्यामुळे वास्तव समस्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे .विविध प्रकारच्या योजना ज्याच्या अर्थव्यवस्थेवर प्रभाव पडतो.महाराष्ट्र शासनाने राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आवण त्यांच्या आरोग्य आवण पोषणात सुधारणा करण्यासाठी ' मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण"9 योजना सुरु करण्यात आली ज्याचा राजकीय फायदा महायुती सरकारला झाला असला तरी ज्यामुळे महाराष्ट्र शासनाची अर्थव्यवस्था प्रभावित झाल्याचे दिसून येते. या योजनेमुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर 36 हजार कोटींचा आर्थिक भार पडत आहे त्यामुळे "नियमित विकास कामांना कात्री लावावी लागत असल्याचे दिसून येते"10 थोडक्यात अशा लोकप्रिय

घोषणा आणि योजना या निवडणुकीत विजय मिळविण्यासाठी राजकीय पक्षांकडून वापरल्या जात आहेत परंतु त्याचा दूरगामी परिणाम व्यवस्थेवर पडत असल्याचे दिसून येते .

**5.स्त्रियांचा अत्यल्प राजकीय सहभाग :-**

लोकशाही शासन हे जनतेच्या माध्यमातून सत्ता वापरणारे शासन असले तरी जनता म्हणजे फक्त पुरुषांचीच मक्तेदारी यात निर्माण झाल्याचे दिसून येते.लोकशाही हा आदर्श शासन प्रकार म्हणून गणला जात असला व त्याचे समर्थन हे जगातील सर्वच विकसित देश करत असले तरी महिलांच्या सत्तेतील प्रवेशाच्या समर्थनार्थ उत्सुक असल्याचे दिसून येत नाही महिलांना मतदान अधिकार देखील सहजासहजी मिळाला नाही त्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागल्याचे उदाहरण आहे .प्रत्यक्ष लोकशाहीचा देश म्हणून गौरविण्यात येत असलेल्या स्वींसत्सर्लंड येते महिलांना 1978 पर्यंत मतदानाचा अधिकार देखील नव्हता यातून महिलांच्या प्रति राजकीय सत्तेतील सहभागाविषयी नकारात्मक भावना दिसून येते. “2024 च्या लोकसभा निवडनुकीसाठी 797 (10%) महिला उमेदवार उभ्या होत्या ,2019 मध्ये 716 (9%) ,2014 मध्ये 640(8%),तर 2009 मध्ये हे प्रमाण 556 (7%) होते”11 महिलांच्या राजकीय सहभागाचे हे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून येते. लोकशाहीमध्ये स्त्री आणि पुरुष प्रमाण समान असायला हवे परंतु आज हे प्रमाण अत्यल्प असल्याने लोकशाहीसमोर आव्हान निर्माण झाले आहे.

**6.मानवी हक्कविषयक प्रश्न :-**

व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासठी मानवी हक्क आवश्यक असून लोकशाही शासनात व्यक्तीच्या हक्काची हमी दिली असल्याने त्याचे समर्थन हे केले जाते परंतु गेल्या काही दिवसांपासून मानवी हक्क अवमूल्यना च्या घटना सातत्याने घडत असल्याने लोकशाही शासनावर जनतेचा विश्वास उडत चालल्याचे निदर्शनास येत आहे .2018-2019 मध्ये 89584,2019-20- मध्ये,76628, तसेच 2020-21-74968, तर 2021-2022-64170 इतक्या मानवी हक्क उल्लंघनाच्या घटना या लोकशाहीसमोर आव्हान निर्माण करणाऱ्या असल्याचे दिसून येते.

**7. माध्यमांचा दुरुपयोग:-**

सोशल मिडीयाने क्रांतिकारी बदल केला असला तरी त्याचा अतिरेख मोठ्या प्रमाणात होताना दिसून येत आहे खोटी माहिती, अफवा आणि प्रचारामुळे लोकमत दिशाभूल होते. त्यामुळे ही देखील एक समस्या म्हणून समोर आली आहे .

**8. तंत्रज्ञानाचा गैरवापर;-**

तंत्रज्ञान मानवी जीवन सुखकर करण्यासाठी मानवाने तयार केले असले तरी त्याचा देखील मानव चुकीचा वापर करताना दिसतो.आपल्या स्वार्थासाठी त्याचा वापर करण्याची प्रवृत्ती वाढली आहे .तंत्रज्ञानाचा अयोग्य वापर करू मतदारांवर प्रभाव टाकणे, डेटा गैरवापर करणारी व्यवस्था ही नवी आव्हाने आहेत.

**लोकशाहीवरील आव्हानांवरील उपाय**

लोकशाही ची वरील काही आव्हान हे लोकशाहीवर प्रश्नाचिन्ह उपस्थित करत असले तरी लोकशाही व्यवस्था हीच समाजासाठी कल्याणकारी असल्याचे दिसून येते तरी देखील त्यात काही दोष ज जरी असले तरी लोकशाही टिकवण्यासाठी आणि बळकट करण्यासाठी पुढील उपाय आवश्यक आहेत :

**अ) सशक्त लोकशिक्षण:-**

लोकशाही शासन हे प्रगत शासन असून नवीन युगाशी सुसंगत आहे .लोकशाहीच्या यशस्वीकरणासाठी शिक्षण हे अत्यावश्यक असून नागरिकांमध्ये राजकीय जाणीव जागविण्यासाठी शिक्षण वाढवणे गरजेचे आहे. शिक्षणातून लोकशाही ही सशक्त होऊ शकते त्यामुळे लोकशिक्षण गरजेचे आहे

**ब) पारदर्शक प्रशासन:-**

जे शासन जनतेच्या हिताशी अनुकूल असेल त्याला जनसमर्थन मिळते लोकशाही शासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवणे आवश्यक आहे.

**क) भ्रष्टाचारविरोधी यंत्रणा:-**

भ्रष्टाचार हा कोणत्याही शासनाला लागलेली कीड असते.भ्रष्टाचारामुळे जनतेचा शासनावरील विश्वास उडतो,जनता शासनाच्या राज्यकारभारा विषयी विरोध व्यक्त करताना दिसतात त्याचबरोबर शासनाच्या विरोधात जनमत संघटीत करण्याचा प्रयत्न करतात त्यामुळे स्वतंत्र व प्रभावी यंत्रणांद्वारे भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

**ड) माध्यम साक्षरता**:- माध्यम हे जनमत संघटित करण्याचे ज्याप्रमाणे एक महत्वाचचे साधन आहे त्याचप्रमाणे ते जनमत व्यवस्थेच्या विरोधात देखील संघटित करण्याचे माध्यम आहे त्यामुळे नागरिकांना खोटी व खरी माहिती ओळखण्याचे शिक्षण देणे आवश्यक आहे.

**इ) समावेशक विकास:-**सर्व घटकांचा विकास साधून सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करणे आवश्यक आहे.

**ई) तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर** ई-गव्हर्नन्स, डिजिटल सहभाग यांचा उपयोग लोकशाही मजबूत करण्यासाठी केला पाहिजे.

**निष्कर्ष:-**

लोकशाही ही मानवजातीने विकसित केलेली सर्वोत्तम शासनपद्धती मानली जाते. तिचे यश नागरिकांच्या जागरूकतेवर, नैतिकतेवर आणि सक्रिय सहभागावर अवलंबून असते. आज लोकशाहीसमोर अनेक आव्हाने असली, तरी योग्य उपाययोजना, मूल्याधिष्ठित राजकारण आणि सशक्त नागरिकत्व यांच्या माध्यमातून लोकशाही अधिक बळकट करता येऊ शकते. लोकशाही ही सतत विकसित होणारी प्रक्रिया आहे. ती जपणे, सुधारणे आणि पुढे नेणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. सशक्त लोकशाहीच सशक्त राष्ट्राची पायाभरणी करते, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे..

**संदर्भ सूची**


1. 1.गर्दे दि.का.(डॉ.) व बाचल वि.मा.(डॉ.) 1975,आधुनिक राजकीय विश्लेषण , **कॉन्टीनेन्टल** प्रकाशन,पुणे .पृष्ठ282.2. डॉ.ज .रा.शिंदे,डॉ.प्रशांत अमृतकर ,समकालीन राजकारणातील प्रमुख समस्या ,चिन्मय प्रकाशन औरंगाबाद,पृष्ठ 194.
2. 3.एच.सी.शर्मा, भारतीय राजनीती की वर्तमान प्रवृतीयां,ओमेगा पब्लिकेशन्स,नई दिल्ली, पृष्ठ 79.
3. 4.The Usthadian ,Feb. 14,2025.
4. सरकारनामा ,ई पेपर ,15जाने.2026.
5. 6.महाराष्ट्र टाईम्स,12 जाने.2026.
6. ADR RIPORT ,18 APRIL 2014
7. ADR RIPORT ,2009,2014,2019,2024 लोकसभा निवडणूक.
8. 9.महिला व बालविकास विभाग ,शासन निर्णय क्रमाक-मबावि 2024/प्र.क्र.96/कार्या -2,12 जुलै 2024.
9. लोकमत ईपेपर- 3 फेब्रुवारी 2026.
10. ADR RIPORT ,2009,2014,2019,2024 लोकसभा निवडणूक.


**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*